# गृहप्रवेश

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वास्तुशांत करुन घरामध्ये प्रवेश करणे कधीही श्रेयस्कर ठरते. परंतु काही वेळा काही कारणास्तव वास्तुशांत करणे शक्य नसेल परंतु नवीन घरामध्ये रहाण्यास जाणे अत्यावश्यक असल्यास कलशपूजन/ गृहप्रवेश करुन नवीन घरात रहाण्यास जावे.

चांगल्या मुहुर्तावर गणपतीपूजन व कलशपूजन करुन मंगल वाद्य व गुरुजींच्या मंत्रघोषात गृहप्रवेश केला जातो. त्यानंतर शेगडीची पूजा करुन दूध उतू घालवले जाते. दूध उतू जाणे (फक्त पूजेच्या दिवशी, दररोज नव्हे) हे समृद्धीचे प्रतिक समजले जाते. नंतर शक्य असल्यास काही गोड पदार्थ शिजवावा व त्या दिवशी नवीन वास्तुमध्येच मुक्काम करावा. मात्र नंतर लवकरात लवकर वास्तुशांत करणे आवश्यक असते.

ह्या पूजेसाठी लागणा-या सर्वसाधारण साहित्याची यादी. (पूजेपूर्वी मुहुर्त व यादीबद्दल गुरुजींचा सल्ला घ्यावा)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हळद, कुंकु, गुलाल | | जानवीजोड | | ब्लाऊजपीस २ | | चौरंग १ | |
| रांगोळी | | उदबत्ती | | केळी६ | | पाट किंवा आसने ३ | |
| नारळ २ | | कापूर | | फळे ५ | | समई | |
| सुपाऱ्या १० | | तोरण, | | सुट्टी फुले | | निरंजन | |
| हळकुंडे ५, बदाम ५ | | गणपती चित्र | | हार २ | | पळी भांडे | |
| खारका ५ | | काळी बाहुली, सुई दोरा | | १ मोठा हार (दारासाठी) | | कलश २, ताम्हण २ | |
| सुट्टे पैसे १० नाणी | | लिंबू १, हिरव्या मिरच्या ५ | | | | स्टील ताटे / ट्रे २ | |
| तेल,तुप, | | तांदूळ १ कि. | | बेल, दुर्वा, तुळशी | | वाट्या ८ | |
| वाती, फुलवाती | | गूळ खोबरे | | विड्याची पाने २५ | | घंटा, बाळकृष्ण | |
| काड्यापेटी | | खडीसाखर, पेढे | | आंब्याचे डहाळे | | घरचे देव | |
| हात पुसण्यासाठी वस्त्र किंवा नॅपकिन २ | | | | तोरण बांधण्यासाठी दाराला खिळे ठोकणे, चिकटपट्टी | | | |